| MHYA210004842023 | | |
|---|---|---|
| | दाखल तारीख | २७/०२/२०२३ |
| | नोंदणी तारीख | २७/०२/२०२३ |
| | निकाल तारीख | ०१/०४/२०२६ |
| | कालावधी | ०३ व. ०१ म. ०४ दि. |

**प्रपत्र–अ**

**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालय, वणी, ता.वणी, जि.यवतमाळ**

(पिठासीन अधिकारी **शहाजी दत्तराव भोसले**)

(न्या.अ.सांकेतांक क्र.एम.एच.०२८७३)

**न्यायनिर्णय दि.०१/०४/२०२६**

**सं.फौ.ख.क्र.३२०/२०२३** **नि.क्र.११ खाली**

(प्रथम खबरी अहवाल तपशील : गुन्हा क्र.५७१/२०२२, पोलीस ठाणे, **शिरपुर**, ता.वणी, जि.यवतमाळ.

| | |
|---|---|
| **अभियोग पक्ष** | **महाराष्ट्र सरकार,**<br>तर्फे पोलीस ठाणे अधिकारी,<br>पोलीस ठाणे, **शिरपुर**,<br>ता.वणी, जि.यवतमाळ |
| मार्फत | विद्वान सहाय्यक सरकारी वकील : श्रीमती एम.डी.वायचाळ. |
| **आरोपी** | **प्रमोद वासुदेव टोंगे,**<br>वयः ४५ वर्षे, व्यवसायः मजुरी,<br>रा.शिंदोला, ता.वणी, जि.यवतमाळ. |
| **मार्फत** | विद्वान वकील श्री.व्ही.व्ही.तेलतुंबडे. |

**प्रपत्र–ब**

| | |
|---|---|
| गुन्ह्याचा दिनांक | २९/१२/२०२२ |
| प्राथमिक खबरी अहवाल दिनांक | २९/१२/२०२२ |
| दोषारोप पत्राचा दिनांक | २२/०२/२०२३ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १३/११/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | १३/१२/२०२४ |

| | |
|---|---|
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | ०१/०४/२०२६ |
| सजा सुनावणीचा दिनांक, जर असेल | निरंक. |

**<u>आरोपीची माहिती</u>**

| अ. क्र. | नाव | अटक दिनांक | जमानत दिनांक | शिक्षा कलमे | निर्दोष/ शिक्षा | आरोपीस दिलेली शिक्षा | फौ.प्र.सं. कलम ४२८ करीता आरोपीचा कोठडीतील कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रमोद वासुदेव टोंगे | निरंक | २४/०९/ २०२४ | कलम ६५(ई) म.दा.का. | आरोपीस निर्दोष सोडण्यात आले. | निरंक | निरंक |

**<u>प्रपत्र–क</u>**

**<u>अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाचे साक्षीदार</u>**

**<u>अ. अभियोग पक्ष :</u>**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | गंगाधर साहेबराव घोडाम, नि.क्र.११ खाली | फिर्यादी |

**ब.बचाव पक्षाचे साक्षीदार :– निरंक.**

**क.न्यायालयाचे साक्षीदार :– निरंक.**

**<u>अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाचे निशाणी क्रमांक :–</u>**

**अ. अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१३/अ.सा.क्र.१ | सूचनापत्र |
| २. | नि.क्र.१४/अ.सा.क्र.१ | जप्ती पंचनामा |
| ३. | नि.क्र.१५/अ.सा.क्र.१ | फिर्याद |
| ४. | नि.क्र.१६/अ.सा.क्र.१ | छापील खबर |

| | | |
|---|---|---|
| ५. | नि.क्र.१७/अ.सा.क्र.१ | मुद्देमाल पावती |
| ६. | नि.क्र.१८/अ.सा.क्र.१ | सी.ए. फार्म |

**ब.बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक :– निरंक.**

**क.न्यायालयाचे निशाणी क्रमांक :– निरंक.**

**ड. वस्तु :– निरंक.**

**न्यायनिर्णय**

(पारित दिनांक ०१/०४/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(ई) नुसार चालविण्यात आला. प्रकरणातील माहिती व पुराव्यावरुन माझे समक्ष खालील मुद्दे निघतात. मी त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे कारणमिमांसेसह देत आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दि.२९/१२/२०२२ रोजी रात्री ०७.४० वाजताचे दरम्यान मौजा शिंदोला, ता.वणी, जि.यवतमाळ येथे आरोपी विनापरवाना अवैधरीत्या विक्री करण्याचे उद्देशाने देशी दारुचे प्रत्येकी ९० मि.ली.चे १० शिश्या बाळगतांना मिळुन आला, असे अभियोग पक्षाने सिध्द केले काय ? | .....नाही. |
| २. | आदेश ? | .....आरोपीस निर्दोष सोडण्यात आले. |

**–का र ण मि मां सा–**

**मुद्दा क्र.१ करीता –**

०२. आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी अभियोग पक्षाने प्रपत्र–क प्रमाणे केवळ फिर्यादीची साक्ष नोंदविली आहे. प्रकरणातील इतर साक्षीदारांना साक्ष समंस पाठवुन ते हजर झाले नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीविरुध्द अभिलेखावर पुरावा आल्यामुळे त्याची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अंतर्गत जबानी नोंदविण्यात आली. आरोपीचा बचाव संपुर्ण नकारात्मक आहे. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

०३. सा.क्र.२/फिर्यादी गंगाधर घोडाम यांनी कथन केले आहे की, दि.२९/१२/२०२२ रोजी त्यांनी दोन पंचाना सुचनापत्र देवून त्यांचेसमक्ष आरोपीकडून ९० मि.लि.चे १० शिश्या जप्त केल्या. त्याबाबत, त्यांनी जप्ती पंचनामा तयार केला. त्यानंतर, त्यांनी पोलीस ठाण्यात येवून आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. त्यांनी जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यात जमा केला व सी.ए.फार्म तयार केला. गुन्ह्याचा पुढील तपास पो.उप.नि. कांडुरे यांनी केला व तपासअंती आरोपीविरुध्द दोषरोपपत्र सादर केले. उलट तपासात त्यांनी मान्य केले आहे की, नि.क्र.१३ वरील सूचनापत्रामध्ये ठिकाण व वेळ नमूद नाही व नि.क्र.१८ वरील सी.ए. फॉर्ममध्ये जप्त दारु नमूना कोणामार्फत पाठविला, हे नमूद नाही. शेवटी, त्यांनी आरोपीविरुद्ध खोटी फिर्याद दिल्याचे नाकारले आहे.

०४. अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सा.क्र.१/फिर्यादी गंगाधार घोडाम यांनी आरोपीकडून देशी दारु जप्त केल्याचे कथन केले आहे. परंतु, फिर्यादीने जप्त मुद्देमालाचे वर्णन कथन केले नाही. त्याचप्रमाणे, त्यांचे पुराव्याला पुष्टी देणारा अभिलेखावर कोणताही पुरावा आला नाही. तसेच, फिर्यादीने जप्त केलेला मुद्देमाल प्रतिबंधीत होता, याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा दाखल नाही. त्यामुळे, फिर्यादीने आरोपीकडून जप्त केलेला मुद्देमाल प्रतिबंधीत होता, हे सिद्ध होत नाही. तसेच, फिर्यादीने पंचांना दिलेले सुचनापत्रामध्ये तारीख, वेळ व आरोपीचे नाव नमूद नाही. त्याचप्रमाणे, अभिलेखावरील सी.ए. पत्रामध्ये जप्त नमुना कोणामार्फत तपासणीकरीता पाठविला, याबाबत त्याचेवर काहीएक नमूद नाही. तसेच तो नमुना कोणी प्रयोगशाळेमध्ये जमा केला, याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा दाखल नाही. अशा परिस्थीतीमध्ये, सा.क्र.१/फिर्यादी गंगाधर घोडाम यांचे पुराव्यावर विश्वास ठेवता येत नाही.

०५. अभियोग पक्षाने प्रस्तुत प्रकरणातील तपास अधिकारी, मुद्देमाल मोहरर व नमुना वाहक यांचा पुरावा नोंदविला नाही. अशा परिस्थितीमध्ये, आरोपीकडून प्रतिबंधित मुद्देमाल जप्त करण्यात आला, ही बाब सिद्ध होत नाही. म्हणून, वर नमुद परिस्थितीचा एकत्रीत विचार करता आरोपीवरील दोषारोप संशयापलीकडे सिध्द होत नाही. त्याअनुषंगाने मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देतो.

**<u>मुद्दा क्र.२ करीता –</u>**

०६. मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष लक्षात घेता, आरोपी निर्दोष सुटण्यास पात्र आहे. त्यामुळे, प्रकरणातील जप्त देशी दारुच्या प्रत्येकी ९० मि.ली.चे १० शिश्या अपील कालावधीनंतर नियमानुसार नष्ट करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, वणी यांच्याकडे पाठविणे न्यायोचीत ठरेल. आरोपीला यापुर्वीच फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देण्यात आला आहे. सबब, मुद्दा क्र.१ चे निष्कर्ष लक्षात घेता, मी करीता मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश देतो,

## <u>आदेश</u>

१. आरोपीची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) चे दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचा जात मुचलका व जामीन रद्द करण्यात यावा.

३. जप्त देशी दारुच्या प्रत्येकी ९० मिलीचे १० शिश्या अपील कालावधीनंतर नष्ट करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क, वणी यांचेकडे पाठविण्यात याव्यात.

४. आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे जामीन देण्यात आला.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE

**(शहाजी दत्तराव भोसले)**

दि.०१/०४/२०२६

न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
न्यायालय क्र.१, वणी.

मी, अभय प्रमोद भोयर, लघुलेखक (सह दिवाणी न्यायालय (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), वणी) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.